महत्त्वाचे

'अभाविप'तर्फे झाशीची राणी यांना अभिवादन

औरंगाबाद : शूरवीर असलेल्या झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची जयंती अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे साजरी करण्यात आली. क्रांतीचौकातील स्वातंत्र्य स्मारक येथे विद्यार्थी परिषदेचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी राणी लक्ष्मीबाई यांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची १९ नोव्हेंबर जयंती दिन. देशभर विद्यार्थिनी दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त परिषदेच्या कार्यकर्त्यांनी 'चमक ऊठी सन सत्तावन में, वो तलवार पुरानी थी! खूब लडी मर्दानी वो तो झाँसीवाली राणी थी', 'भारत माता की जय', 'वंदेमातरम' अशा घोषणाही देण्यात आल्या. यावेळी 'अभाविप'चे कार्यकर्ते उपस्थित होते.

योगेश देसरडा यांची निवड

औरंगाबाद : भाजपच्या वैद्यकीय

आघाडीच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी जालना गुरु मिश्री होमिओपॅथिक महाविद्यालयाचे संचालक डॉ. योगेश शांतीलाल देसरडा यांची नियुक्ती करण्यात आली. आघाडीचे राज्याध्यक्ष डॉ. अजित बोपछडे यांनी १३ नोव्हेंबर रोजी जळगाव येथे एका मेळाव्यात देसरडा यांना नियुक्तीपद दिले.

हज हाऊसचे काम सुरु करावे

औरंगाबाद : किलेअर्क येथे शासनातर्फे हज हाऊस बांधण्याची प्रक्रिया सुरु आहे. मागील काही दिवसांपासून हज हाऊसच्या उभारणीचे काम बंद आहे. हे काम त्वरित सुरु करावे, अशी मागणी राज्यमंत्री दिलीप कांबळे यांच्याकडे गब्बर ॲक्शन कमिटीतर्फे करण्यात आली. यावेळी मकसूद अन्सारी, हफीज अली, इम्रान खान, रियाज बागवान, जावेद खान आदींची उपस्थिती होती.

शब्बीर अन्सारी : गुन्हे तर संचालकांवर दाखल व्हायला पाहिजेत

'वक्फ बोर्डा'वर प्रशासक नेमा

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड तातडीने बरखास्त करुन तेथे प्रशासकाची नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी आज येथे तहरिक औकाफचे नेते शब्बीर अन्सारी यांनी एका पत्रपरिषदेत केली.

६ नोव्हेंबर रोजी वक्फ बोर्डाच्या कार्यालयाला कुलूप ठोकल्यानंतर त्यांच्यावर व त्यांच्या सहकाऱ्यांवर ९ नोव्हेंबर रोजी ३५३ चा गुन्हा दाखल करण्यात आला. यासंदर्भात ते म्हणाले की, बोर्डाच्या संचालक मंडळाने पोलिसांवर प्रचंड दबाव आणून गुन्हा दाखल करायला लावला. मग त्याचदिवशी गुन्हा का दाखल झाला नाही? ९ नोव्हेंबरला पोलीस आयुक्तांची संचालकांनी भेट घेतल्यानंतर आमच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. यातील एक संचालक हबीब फकी हे बोगस मुतवल्ली आहेत.

आम्हाला संपवण्यासाठी व अटक करुन मानसिक खच्चीकरण करण्यासाठी संचालक प्रयत्न करीत आहे. वक्फ बोर्डाप्रती संचालक व सरकारही नकारात्मक भूमिकेतच आहे. आम्हाला दाबण्याचा प्रयत्न होत असला तरी आम्ही तेथील गैरप्रकारांविरुद्ध आवाज उठवत राहणार व आंदोलन तीव्र करणार अशी ग्वाहीही शब्बीर अन्सारी यांनी यावेळी दिली.

आता आम्ही फक्त कार्यालयाला कुलूप लावले. यापुढचे आंदोलन प्रचंड राहील, असा इशारा त्यांनी दिला. सोशल मीडियावरुनही आमची बदनामी सुरु आहे. जोरसे बोलो लेकिन झूठ बोलो असे सर्व काही चालू असले तरी आम्ही घाबरणार नाही, असे अन्सारी यांनी ठणकावले.

माझ्याबद्दल त्यांना प्रचंड आदर आहे; पण माझा कुणी दुरुपयोग करीत आहे, हा आरोपही अन्सारी यांनी फेटाळला. त्यांना असा का संशय येतोय हेही त्यांनी सांगितले. एका प्रश्नाच्या उत्तरात आपण ओबीसीचे काम सोडले नसल्याचे स्पष्ट केले.

मौलाना अब्दुल कय्युम नदवी, मुस्तफा फारुक, जहीर सिद्दीकी आदींची या पत्रपरिषदेस उपस्थिती होती.

सर्व संचालक कुठे न कुठे अडकलेले...

- वक्फ बोर्डाचे सर्वच संचालक कुठे न कुठे अडकलेले आहेत. ते चोर आहेत. तुलनेने राजीनामा दिलेले अध्यक्ष एम.एम. शेख हे जास्त कुठे अडकलेले नाहीत. काही प्रकरणांमध्ये त्यांच्यावर आरोप करण्यात आलेले आहेत. आमच्यावर त्यांच्या बाजूने काम करतो असा होत असलेला आरोप चुकीचा आहे.
- आम्ही जनतेसाठी काम करीत आहोत. वक्फच्या संपत्तीचे जतन व्हावे ही आमची प्रामाणिक इच्छा आहे. खरे तर वक्फ बोर्डाचे संचालक असूनही कुठे न कुठे अडकलेल्या व वक्फच्या संपत्तीची विक्री करीत असलेल्या संचालकांवर गुन्हे दाखल व्हायला पाहिजेत.

'प्रिझम' ग्रंथाचे थाटात प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : लेखिका ज्योती धर्माधिकारी लिखित 'प्रिझम' या ग्रंथाचे प्रकाशन रविवारी सायंकाळी प्रा. विजय दिवाण यांच्या हस्ते थाटात करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी बीसीयूडी संचालक डॉ. ए. जी. खान, डॉ. नारायणराव मुंढे आदी उपस्थित होते.

जीवन विकास ग्रंथालयाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात बोलताना प्रा. दिवाण म्हणाले, इंग्रजी लिखाण करीत असलेल्या आजकालच्या लेखकांपासून ते स्वातंत्र्योत्तर काळानंतर इंग्रजी लिखाण केलेल्या लेखकांबद्दलची ओळख ज्योती धर्माधिकारी यांच्या प्रिझममधून होते.

स्वातंत्र्योत्तर काळानंतर लिखाण करणारे अनेक जण होते त्यात इंग्रजी लिखाण करणारेही अनेक जण होते. त्यांच्यासह अनेक लेखकांची माहिती प्रिझममध्ये आहे. ही माहिती सर्वांसाठी उपयुक्त असून, ललित, सामाजिक, प्रासंगिक आणि शास्त्र-विज्ञान या सगळ्याच प्रकाराच्या लेखांचे ज्योती धर्माधिकारी यांनी एकत्रिकरण केले आहे.

अशा लिखाणातून वेगळ्या साहित्य प्रकारातले पुस्तक होऊ शकते, असा संदेशच या पुस्तकातून दिल्याचेही डॉ. दिवाण यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप डॉ. ए. जी. खान यांनी केला. शिक्षण, नोकरी, प्रपंच अशा तिन्ही भूमिका पार पाडतानाच आवडीच्या विषयावर लिखाण करण्यासाठी वेळ काढला, हे महत्त्वाचे आहे. याबद्दल धर्माधिकारी यांचे कौतुक करावे तितके कमीच असल्याचे डॉ. खान म्हणाले. डॉ. नारायणराव मुंढे यांनी जालना, औरंगाबादसारख्या वास्तव्यातून धर्माधिकारी यांनी केलेले लिखाण कौतुकास्पद ठरत आहे. त्या आता लेखिका झाल्या आहेत, त्यांची महाविद्यालयीन स्तरावर पदोन्नती व्हावी, ही अपेक्षा व्यक्त केली. सूत्रसंचालन श्रीकांत उमरीकर यांनी केले.

रस्त्याचे काम सुरु... महानुभव आश्रम ते लिंक रोडपर्यंत या पैठण रोडवरील २ कि.मी.चे काम संपून तो रस्ता रहदारीसाठी खुला होण्याची प्रतीक्षा या रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्यांना लागलेली आहे. चार महिन्यांपासून रस्त्याचे काम सुरु असून नोव्हेंबर अखेरपर्यंत रस्ता खुला होईल, असा दावा बांधकाम विभागाने केला आहे.

हज कमिटीचा निर्णय रद्द करण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : केंद्रीय हज कमिटीने २०१८ ते २२ पर्यंत हज यात्रेसाठी नवीन धोरण निश्चित केले आहे. यामध्ये अनेक बाबी अत्यंत जाचक आणि अन्यायकारक असल्याचे निवेदन सोमवारी जनहित संघटनेतर्फे विभागीय आयुक्तांना देण्यात आले. सतत तीन वर्षे अर्ज करणाऱ्यांना पूर्वी हजची संधी होती.

आता ही संधी हिरावून घेतली आहे. ७० वर्षे असलेल्या ज्येष्ठांना थेट हज यात्रेला जाता येईल. केंद्र शासनाने आपल्या नवीन धोरणाचा पुन्हा एकदा विचार करुन जाचक अटी रद्द कराव्यात, अशी मागणी निवेदनात केली आहे. निवेदनावर अध्यक्ष मोहंमद जाकीर मोहंमद कादर, शेख इम्रान शेख इब्राहीम, सय्यद शब्बीर, योगेश थोरात, शेख शफीक, नदीम सौदागर, साजीद कुरैशी, एजाज अन्सारी, सरफराज खान आदींच्या सह्या आहेत.

इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेसच्या वतीने अभिवादन करताना काँग्रेसचे शहराध्यक्ष नामदेवराव पवार, माजी आमदार कल्याण काळे, नगरसेवक भाऊसाहेब जगताप, इब्राहीम पठाण, शेषराव तुपे, मोहन साळवे, स्मारक समितीचे अध्यक्ष अशोक डोळस आदी.

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : देशाच्या माजी पंतप्रधान, लोकनेत्या इंदिरा गांधी यांना आज जयंतीनिमित्त विविध संस्था - संघटनांनी विनम्र अभिवादन केले.

मुकुंदवाडी

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेसच्या वतीने मुकुंदवाडी येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष नामदेवराव पवार, माजी आमदार कल्याण काळे, नगरसेवक भाऊसाहेब जगताप, इब्राहीम पठाण, शेषराव तुपे, मोहन साळवे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा सूत्रसंचालन इंदिरा गांधी स्मारक समितीचे अध्यक्ष अशोक डोळस यांनी इंदिरा गांधी यांची गोरगरिबांविषयीची तळमळ व केलेल्या कार्यांची सखोल माहिती दिली.

कार्यक्रमाला पप्पूराज ठुबे, सोपानराव मगरे, किरण कांबळे, केशव गायकवाड, सुदामराव काकडे, श्रीकांत रणभरे, सुभाष पानभरे, चंद्रमुनी काळे, वसंत गायकवाड, मुसा पटेल, रईसभाई, मुन्नाभाई, बाबासाहेब बोरचटे, बाळू कुलकर्णी, कैलास जुमडे, तात्याराव काकडे, काशीनाथ सुरे, जीवन म्हस्के, भारत जावळे, राधाकिरण गायकवाड, संतोष शेंगुळे, सुभाष गवारे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी कार्यालयात...

देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांचे स्वीय सहायक दत्तात्रय आटुळे यांनी इंदिराजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

महिला काँग्रेसतर्फे अभिवादन....

इंदिराजींच्या मुकुंदवाडी येथील पुतळ्यास शहर महिला काँग्रेसतर्फे अध्यक्षा सरोज मसलगे पाटील यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी सुनीता तायडे, ताहिरा शेख, अर्चना मुंदडा, ललिता साळवे, सुनीता निकम, शकुंतला खरात, सुभद्रा बनकर, संगीता दाभाडे, सुनीता खिराडे, योगेश मसलगे, संतोष बनकर, सुधाकर साळवे, मंगेश दांडगे आदींची उपस्थिती होती.

गांधी भवनात....

जिल्हा व शहर काँग्रेसतर्फे गांधी भवनात इंदिराजींची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी आ. अब्दुल सत्तार, नामदेव पवार, एम. एम. शेख, इब्राहिम पठाण, मुद्दसर अन्सारी,डॉ. पवन डोंगरे, जितेंद्र देहाडे, अतिश पितळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

महापालिकेत कार्यक्रम

इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेत अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी महापौर नंदकुमार घोडेले यांनी इंदिराजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. पीआरओ तौसीफ यांच्यासह कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'फिटनेस पार्टी'ने महामॅरेथॉनच्या महासोहळ्यास प्रारंभ

महामॅरेथॉन फिव्हर : उसळत्या जल्लोषासह औरंगाबादकर म्हणाले 'भागो रे...'

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : आकर्षक प्रकाशयोजना, थिरकण्यास भाग पाडेल असे 'रॉकऑन म्युझिक', हॉलीवूड तसेच बॉलीवूडच्या तालावर थिरकत आबालवृद्धांनी केलेला उत्स्फूर्त जल्लोष असे उत्साहवर्धक वातावरण सॅफ्रॉन लॅण्डमार्क प्रस्तुत औरंगाबाद महामॅरेथॉनच्या तयारीसाठी रंगलेल्या 'फिटनेस' पार्टीदरम्यान दिसून आले. रविवारी सायंकाळी लोकमत लॉन येथे या महाराष्ट्रातल्या पहिल्यावहिल्याच 'फिटनेस' पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने औरंगाबादकरांना या पार्टीतला जल्लोष प्रथमच अनुभवण्याची संधी मिळाली.

आठवडाभर मेहनत करुन थकल्यानंतर येणारी रविवारची सायंकाळ प्रत्येक कुटुंबासाठी महत्त्वाची असते. कुटुंबासोबत बाहेर पडण्याचे नियोजन यावेळी केले जाते; पण १९ नोव्हेंबरच्या रविवारी मात्र औरंगाबादकरांची पावले इतर कोणत्याही दिशेला न वळता थेट 'लोकमत लॉन'च्या दिशेने येऊ लागली. कारण दि. १७ डिसेंबर रोजी शहरात होणाऱ्या 'महामॅरेथॉन' सोहळ्याचा 'फिव्हर' चढण्यास आता सुरुवात झाली असून, यानिमित्ताने आयोजित फिटनेस पार्टीत कुटुंबियांसमवेत धमाल करण्यात सर्वच धावपटू अतिशय उत्सुक होते.

महामॅरेथॉनसाठी नावनोंदणी केलेल्या धावपटूंनी या पार्टीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पार्टीचे उत्कृष्ट आयोजन पाहूनच अनेकांना व्यायाम करण्यासाठी नवे स्फुरण चढले होते. महामॅरेथॉनसाठी शहरवासीयांमध्ये उसळलेल्या प्रचंड उत्साहाची प्रचीती या फिटनेस पार्टीत आली. ज्येष्ठ नागरिकही 'भागो रे..' म्हणत या महामॅरेथॉनमध्ये तरुणांना जबरदस्त टक्कर देणार आहेत, याची झलक या पार्टीतच पाहायला मिळाली.

लोकमत लॉन येथे या महाराष्ट्रातल्या पहिल्याच 'फिटनेस पार्टी'मध्ये गाण्याच्या तालावर थिरकताना धावपटू. दुसऱ्या छायाचित्रात धावपटूंना व्यायामाचे प्रकार शिकविताना तज्ज्ञ मार्गदर्शक.

स्तुत्य उपक्रम

दि. १७ डिसेंबर रोजी शहरात होणाऱ्या महामॅरेथॉन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आम्ही सर्वजण सज्ज झालो आहोत. यासाठीच मी माझ्या संपूर्ण कुटुंबासह या पार्टीत सहभागी झालो. फिटनेसबाबत जागरुकता येण्यासाठी 'लोकमत'ने सुरु केलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. ज्यांनी महामॅरेथॉनसाठी अजूनही आपले नाव नोंदविलेले नाही, त्यांनी त्वरा करावा आणि या उपक्रमाला भरभरुन प्रतिसाद द्यावा. मागील वर्षीही आम्ही सहकुटुंब या स्पर्धेत सहभागी झालो होतो.

- डॉ. सचिन सोनी

नवीन नृत्य प्रकार भावले

आजवर झुंबा, भांगडा, पिलोझिंग, मसाला बॉलीवूड या नृत्य प्रकारांबाबत फक्त ऐकून माहिती होते; मात्र त्याचा अनुभव कधीही घेतलेला नव्हता. महामॅरेथॉननिमित्त आयोजित फिटनेस पार्टीचा आनंदही यानिमित्ताने पहिल्यांदाच घेता आला आणि हे नृत्यप्रकारही शिकता आले, यासाठी 'लोकमत'चे मनापासून आभार. 'लोकमत' नेहमीच नवनवीन गोष्टींचे आयोजन करुन शहरवासीयांना अनुभवसंपन्न करते, हे विशेष.

- नितीन घोरपडे (अल्ट्रा मॅरेथॉन रनर)

जबरदस्त आयोजन

थिरकायला भाग पाडणाऱ्या आकर्षक संगीतावर नृत्यमय व्यायाम करणे सर्व धावपटूंसाठी अत्यंत आनंददायी ठरले. अशा जबरदस्त पार्टीचे आयोजन केल्याबद्दल 'लोकमत'चे खूप खूप धन्यवाद. व्यायाम केल्यानंतर आम्ही सगळ्यांनी हेल्दी ड्रिंक आणि फूडचा मनमुराद आनंद लुटला. आता आम्ही महामॅरेथॉनसाठी कसून प्रयत्न करीत असून, या महासोहळ्याची आतुरतेने वाट पाहत आहोत.

- भावेश सराफ

'वी आर रेडी...' -

महामॅरेथॉनची 'वार्म अप' तयारी म्हणून लोकमत लॉन येथे आयोजित करण्यात आलेली 'फिटनेस पार्टी' आम्हा सर्व धावपटूंसाठी अत्यंत रंजक ठरली. यानिमित्ताने अशा प्रकारच्या पार्टीचा अनुभव औरंगाबादकरांनी पहिल्यांदाच घेतला. पार्टीचे आयोजन अत्यंत उत्कृष्ट करण्यात आले होते. या पार्टीदरम्यान महामॅरेथॉनसाठी करण्यात आलेल्या आवाहनाला आम्ही सर्व धावपटूंनी 'येस... वी आर रेडी...' म्हणत तेवढाच उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

- किशोर देसले

महामॅरेथॉनची आगामी आकर्षणे

- महामॅरेथॉनची ही 'वार्म अप' पार्टी अनेकांसाठी अविस्मरणीय आणि उत्कंठावर्धक ठरली, हे निश्चित. या महामॅरेथॉनचा महासोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, या महासोहळ्यापर्यंत धावपटूंसाठी अशाच अनेक आकर्षक गोष्टींचे आयोजन करण्यात आले आहे. '
- फिटनेस पार्टी'ने या आकर्षणांची जणू सुरुवातच झाली. आता यानंतर कोणता धमाकेदार सोहळा आपणास अनुभवायला मिळेल, याविषयी उपस्थित धावपटूंमध्ये रंगलेल्या चर्चेला यानिमित्ताने उधाण आले होते. तुम्हीही महामॅरेथॉनसाठी लवकरात लवकर नावनोंदणी करा आणि या प्रवासादरम्यान असणाऱ्या आगामी आकर्षक सोहळ्यांचे साक्षीदार बना.
- अधिक माहितीसाठी व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०- ३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. धावपटू **www.mahamarathon.com या** संकेतस्थळावरही नोंदणी करु शकतात.

स्पर्धा

- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

हेल्दी फूडचा आस्वाद

- व्यायाम करुन नवचैतन्य मिळविल्यानंतर वेदिका हेल्थ केअर यांच्यातर्फे देण्यात आलेल्या 'हेल्दी' पदार्थांचा आस्वाद घेऊन पार्टीचा समारोप झाला. यामध्ये धावपटूंना आवळा ज्यूस, तुलसी ज्यूस, जांभुळ ज्यूस मोफत देण्यात आले.

नृत्यमय 'वार्म अप'-

- रिलॅक्स झीलच्या एक्सपर्ट ट्रेनर्सनी जबरदस्त व्यायाम प्रकार शिकवून उपस्थितांना व्यायामाचा आनंद मिळवून दिला. या ट्रेनर्सच्या मार्गदर्शनाखाली झुंबा फिटनेस, भांगडा फ्रिक्वेन्सी, पिलोझिंग, मसाला बॉलीवूड, झील फिटनेस यांसारखे नवनवीन व्यायाम प्रकार आत्मसात करुन उपस्थितांनी फिटनेस पार्टीचा 'झिंगाट' आनंद लुटला. आतापर्यंत पारंपरिक व्यायाम केलेल्या अनेकांना नृत्य करत करत व्यायाम करण्याचा हा नवा प्रकार अतिशय आवडून गेला. सायंकाळी ६ ते ८ च्या सुमारास अंगावर काटा आणणाऱ्या थंडीतही या व्यायाम प्रकारांमुळे धावपटूंना घामाच्या धारा लागल्या होत्या. तरुणांच्या तालात ताल मिसळून झुंबाच्या तालावर ठेका धरुन व्यायाम करणारे ज्येष्ठ नागरिक अनेकांसाठी कौतुकाचा विषय ठरले होते.